# For Every Daughter...

## स्टेशन डायरी २



**रेवण जाधव**

# फ़ॉर एव्हरी डॉटर

## स्टेशन डायरी - २

### रेवण जाधव

### ई साहित्य प्रतिष्ठान

फ़ॉर एव्हरी डॉटर  (For every Daughter)

स्टेशन डायरी – २

कथा

लेखक : रेवण जाधव

Email :- jadhavrevan@rediffmail.com

Ph : 09370522501

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**या कथेतील सर्व नांवे, घटना, स्थळे व संस्था काल्पनिक असून त्यांचा प्रत्यक्ष घटना, संस्था किंवा व्यक्तींशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.**

# फॉर एव्हरी डॉटर

त्या दिवशी संध्याकाळी माझी मुलगी जेवत होती आणि मी त्या माय लेकींच्या सोबत बसून गप्पा मारत होतो. संध्याकाळी पाऊणे नऊची वेळ असेल, माझा मोबाईल वाजला. नंबर ओळखीचा नव्हता. मी फोन उचलला, “जाधव साहेब मी परशुराम परब बोलतोय. जरा घरी येता का? पूजाला काहीतरी झालंय”. इतकेच बोलून परबांनी फोन कट केला. त्यांच्या आवाजातील चिंता लक्षात घेऊन मी लगेच त्यांच्याकडे जायला निघालो. माझी दुचाकी सवयीप्रमाणे रस्त्याने धावत होती तर मी विचारात मग्न झालेलो.

पूजा आणि तिचे वडील मला एकदा महाराष्ट्र बँकेत भेटले होते. एल.पी.जी. सिलिंडरचे अनुदान खात्यावर जमा करून घेता यावे म्हणून आधारकार्ड आणि फॉर्म बँकेत द्यायला ते दोघे आलेले होते. पूजा गोड दिसतेच पण तिचा चुणचुणीतपणा पाहून मला खूप छान वाटले. फॉर्मवरचे तिचे अक्षर सुवाच्य, सुरेख होते. मी तिच्याशी फार थोडा वेळ बोललो. परबांना मुलीला चांगले शिकवा असा सल्ला देऊन मी निघून आलो. त्यानंतर दोन वेळा तरी पुन्हा बँकेत भेट झाली तेव्हा मी तिला माझा नंबर दिला होता. “काही गरज पडल्यास किंवा अडचण आल्यास फोन कर”, असेही सांगितले.

त्यानंतर पूजाने फेसबुकवर माझ्या वाढदिवसाची सूचना वाचून मला फोन केला होता. आणि मध्यंतरी एकदा तिच्या घरी जाण्याचा योग आला होता.

परबांनी फोन केला आणि पूजाला काहीतरी झाल्याचे सांगितल्यापासून डोक्यात विचारांचा गोंधळ सुरु झाला. मी अवघ्या पंधरा मिनिटांत शिवाजी नगरला परबांच्या घरी पोहोचलो. पूजा आणि तिची आई रडत होत्या. शेजारी-पाजारी त्यांची समजूत घालत होते. तर काहीजण परबांना पोलीस चौकीत जाण्यासाठी तयार करत होते.

मला पाहून परब धावतच जवळ आले आणि पूजावर कुणीतरी अत्याचार केल्याचे त्यांनी सांगितले. माझा तर विश्वासच बसला नाही. ज्या बातम्या आपण वाचतो, बघतो त्या स्वत:च्या जीवनात अनुभवायला लागतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. बहुधा आपण अशा गोष्टी फ़क्त दुसर्‍यांनाच होणार असं गृहीत धरून जगत असतो. अगदी आपल्या आजूबाजूला अशा गोष्टी घडत असतानाही.

“आपण त्या जागी जाऊन स्वत: पाहू आणि मग पोलिसांत जाऊ”, मी परबांना समजावून सांगितले. लगोलग माझा मित्र रविचंद्र याला फोन करून बोलावून घेतले.

आधी पूजाला शांत करून कुठे, काय आणि कसे घडले हे सविस्तर विचारले. तिने वर्णन केलेल्या ठिकाणी मी, परब आणि रवी गेलो. तिकडून परत येताना आम्ही पोलीस चौकीत तक्रार नोंदवून आलो. मग पूजाला मेडिकल चेकअपसाठी ससूनला नेण्याचे ठरले. त्यांच्याच एका शेजाऱ्याच्या रिक्षाने आम्ही ससून गाठले. थोड्या प्रयत्नानंतर हवे ते डॉक्टर फोनवर उपलब्ध झाले. मी स्वत: त्यांना घटना कळवून लवकर येण्याची विनंती केली. पूजा घाबरलेली होती पण आमच्या धीर देण्याने ती सावरली आणि तिची मेडिकल पार पडली. मी शेजाऱ्यांना पूजाला घरी घेऊन जाण्यास सांगून आम्ही तिघे पुन्हा पोलीस चौकीत गेलो. मेडिकल चेकअपची एक प्रत त्यांना दिली आणि मग परबांच्या घरी गेलो.

माझ्या पत्नीला फोन करून सगळी हकीकत सांगितली. रवीने आज माझ्याच घरी मुक्काम करण्याचे ठरवले. रात्री उशिरापर्यंत बरीच धावपळ करावी लागली. मग आम्ही घरी गेलो. पत्नी जागीच होती. तिने आम्हाला जेवायला वाढले. पूजाबद्दल विचारले. आमची चर्चा जास्त रंगू लागली. पण मुलगी झोपलेली आहे हे मी सांगितल्यावर सगळयांनी आटोपते घेतले आणि आम्ही झोपी गेलो.

त्यानंतर बरोबर दोन दिवस उलटल्यावर पोलिसांचा फोनवर निरोप मिळाला की, “आम्ही वर्णन केलेला एक तरुण त्यांना सापडला आहे, चौकीला येऊन ओळख पटवून जा”. पूजाला सोबत घेऊन परब आणि मी चौकीवर गेलो. पूजाने त्याला ओळखले आणि पोलिसांनी त्याला दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर करण्याची आवश्यक ती तयारी सुरु केली.

कोर्टानेही त्याला एक आठवड्याची पोलीस कोठडी सुनावली. आणि त्यानंतर म्हणजे त्या घटनेला एक महिना उलटायच्या आतच आमची केस कोर्टात उभी राहिली.

पहिल्या सुनावणीच्या दिवशी पूजाला थोडक्यात नक्की काय झाले, कधी झाले, यानेच केले का, असे प्रश्न विचारून पुढची तारीख मिळाली. पण पोलिसांच्या पुढे मोठा पेच उभा होता. त्यांनी पकडलेल्या आरोपीवर शस्त्रक्रिया करून कुणीतरी त्याचा उजवा हात निकामी केला होता. तसेच त्याच्या ओटीपोटावर टाके घातलेले होते. हे नक्की कोणी व का केले याचा तपास पोलिसांना लावायचा होता.

पुढच्या सुनावणीच्या दिवशी पोलिसांनी आपली अडचण कोर्टापुढे मांडून अजून कसून तपास करता यावा म्हणून दोन आठवड्याची मुदत मागून घेतली आणि ती त्यांना मिळाली. त्याच दिवशी आम्ही पूजाला प्रत्येक सुनावणीला येणे अनिवार्य नसावे म्हणून अर्ज केला आणि तशी रीतसर परवानगी मिळवली.

आता पूजा पुन्हा शाळेत जात आहे. आमच्या रोजच्या बोलण्यामुळे तिला बरेच बळ आले आणि तिने पुन्हा रोजचे जीवन जगायला सुरुवात केली. शाळेत, शेजारी, नातेवाईक सगळ्यांना समजावून सांगावे लागले की, “पुन्हा पुन्हा त्या विषयावर तिच्याशी किंवा तिच्यासमोर चर्चा करत बसू नका. त्यामुळे तिच्या मनावर परिणाम झाला आणि तिने जीवाचे काही वाईट केले तर त्याची जबाबदारी तुमच्यावर येईल”.

पुन्हा कोर्टात सुनावणीचा दिवस आला. आज तरी पोलीस काहीतरी माहिती देतील अशी अपेक्षा होती. पण पोलीस अजूनही बऱ्याच बाबतीत अंधारात होते. आरोपीला विचारून, घटनास्थळापाशी चौकशी करूनदेखील त्यांच्या हाती फारसे काही लागले नव्हते. आता या केसमध्ये काय होणार, ही चिंतेची बाब बनली.

आरोपी सापडला, त्याने गुन्हा केल्याचे त्याला आठवत नाही असे त्याने सांगितले. तसेच त्याला असे अधू कुणी केले हेही त्याला आठवत नाही मग नक्की काय करायचे असा सगळ्यांपुढे पेच असताना मी

कोर्टापुढे बोलायची परवानगी मागितली. माझी विनंती मान्य झाली आणि मला बोलण्यासाठी जज साहेबांपुढे उभे राहण्यास सांगितले.

“साहेब या आरोपीची अशी अवस्था मी करून घेतलीये”, माझ्या बोलण्याने त्या कक्षात शांतता पसरली. मी काय सांगतोय ते ऐकायला सगळयांचे कान आसुसले. पोलिसांना तर “काहीच कळले नाही”, असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. मग मीच सगळी हकीकत सांगायला सुरुवात केली.

“साहेब घटना घडलेल्या दिवशी आम्ही त्या ठिकाणी गेलो. आरोपी तिथे नव्हता पण इथे काहीतरी चुकीचे घडले आहे याच्या खुणा मात्र होत्या. आम्ही आजूबाजूला शोध घेतला तेव्हा हा आम्हाला रस्त्याच्या एका बाजूला नशेत पडलेला आढळला. आम्ही त्याला रात्रभर तिथेच जवळच्या एका हॉस्पिटलमध्ये ठेवला. पोलिसांत तक्रार दिली आणि दुसऱ्याच दिवशी याला जोशी डॉक्टरांकडे घेऊन गेलो. त्यांना सगळी घटना सांगितली आणि याचा एक हात निकामी करायचाय अशी विनंती केली. डॉक्टरांनी त्याचा उजवा हात आणि त्याची सेक्स सिस्टम निकामी केली. त्यानंतर त्याच्या खिशात औषधे ठेऊन आम्ही त्याला पुन्हा त्याच ठिकाणी नेऊन सोडला. पण हे सगळे आम्ही केले ते अशा वेळी की जेव्हा तिकडे गर्दी नसते. त्याच दिवशी तो पोलिसांना बेशुद्ध अवस्थेत सापडला. त्याला अटक करून काही विशेष माहिती न मिळाल्याने पोलिसांनी इतरत्र चौकशी सुरु केली पण कुणीही नीट माहिती देऊ शकले नाही. म्हणून मी स्वत: या केसाची चक्रे फिरावी म्हणून तुम्हाला माहिती नसलेल्या गोष्टी उजेडात आणल्या.”

माझे बोलणे संपल्यावर मी पुन्हा जागेवर बसलो. वेळेचे बंधन असल्याने कोर्टाने पुढची तारीख दिली. तोपर्यंत पोलिसांनी मला चौकशीसाठी ताब्यात घेता यावे म्हणून अर्ज केला आणि अटक वॉरंट घेऊन मला ताब्यात घ्यायला घरी आले. पण आमच्या वकिलांना सांगून मी आधीच अटकपूर्व जामीन मिळवला होता. तरीही चौकीत जाऊन तिथल्या साहेबांना काही गोष्टींची तोंडी हमी देऊन व उरलेला घटनाक्रम किंवा उलट तपासणीसाठी कोर्टात हजर राहीन असे सांगून पुन्हा घरी आलो.

नंतरच्या सुनावणीच्या दिवशी आरोपीसाठी वकील घेऊन त्याचे कुटुंबीय कोर्टात हजर होते. त्यादिवशी कोर्टासमोर किंबहुना सर्वांसमोर प्रथमच त्या आरोपीचा इतिहास उलगडला. आरोपीचे नाव – रामप्रताप पासवान, वय – २७ वर्षे, तो मूळचा उत्तर प्रदेशातील एका खेड्यातील रहिवासी. पोट भरण्यासाठी मुंबईत आला. मोठा भाऊ-वहिनी आणि आई-वडिलांसोबत तो मुंबईत राहत होता. तिकडे मित्र, कामावरील लोकांकडून उसने घेतलेले पैसे परत करता येत नाहीत हे लक्षात आल्यावर त्याने चोरी करून खूप पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला. दोन वेळा पकडला गेला पण घरच्यांनी जमीन देऊन त्याला सोडवून आणले. रोज दारू पिण्याचे व्यसन आणि इतर खर्चासाठी पैसा तर पाहिजेच होता म्हणून तो दोनच महिन्यांपूर्वी पुण्यात आला होता. तो फुटपाथवर झोपतो, वडापाव वैगेरे खाऊन दिवस ढकलतो. मिळेल ते काम करायचे आणि दारू प्यायची हा ह्याचा दिनक्रम. तो ज्या रस्त्याने येतो-जातो तिथे असलेल्या शाळेत पूजा शिकते. या रामप्रतापला मग मुलींकडे बघत बसण्याचा छंद लागला. अशातच घटनेच्या दिवशी शाळेतून घरी जायला निघालेल्या पूजाला त्याने छेडले. तिच्या मैत्रिणींनी त्याला दम भरला. मग या रामने तिचा पीछा सुरु केला. पूजा तिच्या सगळ्या मैत्रीणींना सोडून घरी एकटी जाते हे पाहून त्याने तिला पकडून एका पडीक बांधकामाच्या ठिकाणी नेले, तिच्यावर अत्याचार केला आणि निघून गेला. नंतर तो दारू पिऊन परत त्याच जागी आला. तेव्हा पूजा तिथे नाही हे पाहिले. मग तो थोडा वेळ तिथेच बसून राहिला. मग नशेतच कुठेतरी जाताना रस्त्याच्या कडेला पडला.

“जज साहेब रामने हा गुन्हा दारूच्या नशेत असताना केला. म्हणजे तो त्यावेळी पूर्ण शुद्धीवर नव्हता आणि त्याला आपण काय केले याचे भानही नव्हते. म्हणूनच तो पोलिसांना उपयोगी पडेल अशी माहिती देऊ शकला नाही. त्यामुळे त्याला कमीत कमी शिक्षा मिळावी”, अशी विनंती त्याच्या वकिलाकडून करण्यात आली.

“जज साहेब संपूर्ण देशात स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. त्यांचे खटले जलदगती न्यायालयात चालवले जात आहेत, आरोपींना जरब बसावी इतर कुणी असा गुन्हा करू नये म्हणून त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी म्हणून लोक इच्छा व्यक्त करत असताना आपण या केस मध्ये मवाळपणा दाखवल्यास लोकांचा कायद्यावर विश्वास राहणार नाही. म्हणून या खटल्यातील आरोपीच्या अवस्थेकडे न बघता गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन हा खटला चालवला जावा.” आमच्या वकिलाने तोडीचे उत्तर दिले.

न्यायाधीशांनी मला पुढच्या तारखेला उलटतपासणीसाठी हजर राहण्याचे फर्मान सोडून पुढची तारीख देत कामकाज संपवले.

तोपर्यंत मी, मित्र रवी आणि डॉ. जयंत जोशी एकत्र बसून पुढे काय करायचे, कोर्टात काय मुद्दे मांडायचे याची चर्चा करून घेतली.

पूजाने तिचा दिनक्रम पूर्वीसारखाच चालू ठेवला होता. परबही दररोज संपर्क साधून पुढच्या सुनावणीमध्ये काय करायचे याची माहिती घेत होते.

एक दोन वेळा मला चौकीत बोलवून पोलिसांनी दम भरण्याचा प्रयत्न केला. “तुम्ही त्याला असा लुळा करून काय मिळवले? आम्ही आहोत ना आरोपीला शिक्षा द्यायला. तुमच्यामुळे आमची न्यायालयात नाचक्की झाली. तुमची केस वीक असून त्याला फार मोठी शिक्षा होईल असे वाटत नाही”. पण मी आणि रवीने अतिशय संयमाने जे जे घडेल त्याला पूर्ण विचार करून सामोरे जाण्याचा निर्धार केला होता आणि जोशी डॉक्टर आम्हाला मार्गदर्शन करत होतेच. आमचे वकीलही खूप अभ्यासू आणि अनुभवी त्यामुळे आम्ही अगदी निश्चिंत होतो.

सुनावणीसाठी तो दिवस न्यायाधीशांनी खास राखून ठेवला होता. “जाधव तुम्ही आरोपीला परस्पर शिक्षा देऊन नक्की काय मिळवलेत? तुमची या मागे काय भूमिका होती?” मला खुद्द न्यायाधीशांनी प्रश्न विचारला.

अचानक रवी उभा राहिला.

“साहेब या केसमध्ये जितका रेवण तितकाच मीपण इनव्होल्व आहे. त्यामुळे रेवण सोबत मलाही त्या जागेवर उभे करावे आणि प्रश्न आम्हाला कॉमन विचारले जावे आणि आम्ही दोघे मिळून त्याची उत्तरे देऊ. कृपया माझी विनंती मान्य करावी” रवीने कोर्टाकडे विनंती केली आणि ती मंजूर झाली. आता आम्ही दोघे त्या जागेवर उभे राहून काय बाजू मांडतोय याकडे सगळयांचे लक्ष लागले.

“माझ्या मते लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपीला/गुन्हेगाराला अशीच शिक्षा व्हावी असे माझे ठाम मत आहे. फाशी दिल्याने इतरांना जरब बसण्यापेक्षा रोज वर्तमान पत्रात अशा बातम्या वाचायला मिळतच आहेत. दिल्ली निर्भया, शक्ती मील प्रकरणातील आरोपींना फाशी सुनावली पण म्हणून देशभरात लैंगिक अत्याचार एकदम थांबल्याचे दिसत नाही. तर रोज निदान एक तरी बातमी येतेच. याचा अर्थ जरब बसवण्यासाठी काहीतरी वेगळे करायला पाहिजे. म्हणजे आरोपीचा वापरातला हात निकामी करायचा, त्याची सेक्स निर्माण करणारी सिस्टीम निकामी करायची. त्यामुळे तो स्वत:ची कामे स्वत: करू शकणार नाही. आणि पुन्हा असा गुन्हा करण्याची त्याची कुवतच राहणार नाही. त्याला एक वर्षभर तुरुंगात ठेऊन मग सोडून द्यावे. मग त्याच्या घरातील लोकांपासून सगळेच त्याला हिणवतील. तो स्वत:ला नालायक समजायला लागेल, त्याच्यात न्यूनगंड निर्माण होईल आणि एखाद्या दिवशी तो आत्महत्या करेल. लाचारीचे जगणे कुणालाच मंजूर नसते. त्यामुळे त्याला इतका लाचार करायचा की कुणीही त्याला कुठल्याही प्रकारची मदत करणार नाही.” मी माझी बाजू मांडली.

“सर या बाबतीत मी रेवणपेक्षा एक पाऊल पुढचा विचार करतो. त्याचा हातच नाही तर पाय आणि डोळेदेखील निकामी करायचे आणि रस्त्यावर टाकून द्यायचे. त्याचे फोटो पेपरमध्ये छापायचे. मित्र, नातेवाईक, घरच्यांना सांगायचे याला खायलापण देऊ नका. मग त्याला समजेल की आपण खूप मोठी चूक केली आहे. आणि अशा माणसाला रस्त्याने येत-जाता बघणारे कुठलाही गुन्हा करताना दहादा विचार करतील. याबाबतीत तालिबानी शिक्षाच व्हायला हवी असे मला वाटते. त्याशिवाय या समाजात स्त्रियांना सुरक्षितता मिळणार नाही. सर आपण महापुरुषांचे पुतळे उभारतो ते का, तर लोकांनी त्या पुतळयांकडे पाहून प्रेरणा घ्यावी, त्यांचे थोर लोकांचे विचार आचरणात आणावेत. पण लोकांना वाईट गोष्टींपासून परावृत्त करण्याची कायदा ही एकच यंत्रणा आपल्याकडे आहे आणि नियमांचेच जर योग्य प्रकारे पालन होत नसेल आणि लोक सतत नियम मोडत असतील तर त्यांना वठणीवर आणण्यासाठी एक नवी पद्धत अंमलात आणणे गरजेचे आहे.” रवीनेही स्वत:चे मत मांडले.

आता आरोपीच्या वकिलांना काही प्रश्न विचारायचेत काय असे न्यायाधीशांनी विचारले आणि “हो” म्हणत ते वकील महाशय पुढे आले. त्यांचा सर्व रोख माझ्यावरी असणार याची पूर्ण कल्पना मला होती.

“जाधव तुम्ही काम काय करता?” वकील

“मी एका एन.जी.ओ. मध्ये कामाला आहे.” मी

“तुमचे ऑफिस तुम्हाला इतका वेळ कसे काय देते की तुम्ही प्रत्येक सुनावणीला हजर असता?” पोखरकर वकील.

“एन.जी.ओ. मध्ये कामाला असल्याने आमच्या ऑफिसकडून मला या प्रकरणाची सुनावणी संपेपर्यंत वेळेची सूट मिळाली आहे. त्यांनादेखील या विषयाचे गांभीर्य माहिती आहे.” मी

“मी तर एका मॉल मध्ये सेफ्टी ऑफिसर आहे. मला भरपूर वेळ असतो आणि माझ्या कामावरती पण अर्ज केल्यानंतर मला वेळेची सूट मिळाली आहे.” रवी

“जज साहेब या खटल्याशी संबंधित प्रश्न विचारले जाण्याची परवानगी असावी. माझे लोक काय करतात किंवा ते रिकामे असतात याचा या खटल्याशी काही संबंध नाही. इथे एका अतिशय संवेदनशील विषयाची सुनावणी चालू आहे हे लक्षात घेऊन आरोपीच्या वकिलांनी प्रश्न विचारावेत.” आमचे वकील शिंदे कडाडले.

या विनंतीवर जोर देत न्यायाधीशांनीही “खटल्याशी संबंधित प्रश्न विचारावेत, न्यायालयाचा वेळ महत्वाचा असतो. तसेच खटल्याचे स्वरूप पाहता इथे कमी वेळात न्याय देता येणे अपेक्षित आहे” असे सुनावले. यावर आरोपीचे वकील पोखरकर यांनी न्यायालयाची माफी मागितली आणि आम्हाला बसायला सांगून डॉ. जोशी यांना प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली.

“डॉक्टर तुमच्या सारखा जबाबदार माणूस जाधव व कांबळे या लोकांच्या दबावास बळी कसा काय पडू शकतो? तुम्ही शिकलेले तसेच जबाबदार आहात. तुम्ही त्यांची समजूत काढायला हवी होती. तसे न करता तुम्ही त्यांची साथ दिलीत, असे का?” पोखरकर वकील.

“जज साहेब मलाही दोन मुली आहेत. त्यांच्या बाबतीत असे काही घडले तर एक बाप म्हणून मी त्या आरोपीचा जीवदेखील घेईल. रेवण आणि रवी या दोघांना मी खूप जवळून आणि आधीपासून ओळखतो. ते इतरांसारखे अविचारी नाहीत. म्हणून मी त्यांना साथ दिली. माझ्यावर कोणीही कसलाही दबाब आणला नाही किंवा कशाचे आमिष दाखवले नाही.” डॉ. जोशी.

“मग तुम्ही देखील यांच्याइतकेच दोषी आहात असे मी म्हणू शकतो का?” पोखरकर.

“म्हणा की. पण आम्हाला दोषी ठरवून तुम्ही या रामप्रतापने केलेला गुन्हा पुसून नाही टाकू शकणार” डॉ. जोशी.

मग पोखरकरांनी परब यांना प्रश्न विचारण्याची परवानगी मिळवली.

“परब या लोकांनी हे जे काय या रामप्रतापसोबत केले ते तुम्हाला मान्य आहे का?” पोखरकर वकील.

“साहेब ज्याने माझ्या मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त केले त्याला फाशीच दिली पाहिजे. जाधव साहेबांवर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यांनी केलेले सगळे बरोबर आहे. ते नसते तर मला पोलीस, कोर्ट, वकील सगळयांनी नको नको ते प्रश्न विचारून हैराण केले असते. वर माझ्या पोरीची बदनामी झाली

असती ती वेगळीच. जाधव साहेबांनी मला बरेचदा माझ्या मुलीच्या शिक्षणासाठी काय करता येईल याची मदत केली. मी त्यांना या प्रकरणात दोषी मानत नाही त्यांनी केलेले सगळे अगदी योग्य आहे” बोलताना परब यांना रडू कोसळले.

न्यायाधीशांनी ठरवलेला वेळ संपत आल्याने त्यादिवशीचे काम संपवून आम्हाला पुढची तारीख मिळाली. बाहेर आलो तर पोखरकर वकील आमच्याशी बोलण्यासाठी आतुरतेने वाट पाहताना समोर दिसले. “जाधव तुम्ही केलेत ते योग्यच आहे. पण माझा धंदा असा आहे की चुकीच्या माणसासाठी आम्हाला वाद घालावा लागतो. तुम्हाला यश मिळावे अशी माझी मनापासून इच्छा आहे. माझ्या घरात एक नात आहे. हा खटला सुरु झाल्यापासून तिच्याबाबतीत आम्ही सर्व खबरदारी घेतोय. पण समाजात पसरलेली ही कीड कधी कोणाचा बळी घेईल सांगता येत नाही. मी तुम्हाला काही चुकीचे बोललो असेल तर मला माफ करा”.

“तुम्ही माझी माफी मागणे मला अपेक्षित नाही. परबांच्या मुलीला योग्य तो न्याय मिळाला म्हणजे झाले. आपली काही पर्सनल दुष्मनी नाही.” मी आणि रवीने त्यांचा निरोप घेतला.

रामप्रतापवर आरोप निश्चिती झाली. तो गुन्हेगार आढळला. आता त्याला काय शिक्षा होणार याकडे सगळयांचे लक्ष लागून राहिले होते. पुढच्या सुनावणीत शिक्षा होणे आम्हाला अपेक्षित होते. या सुनावणीत पोखरकरांनी पुन्हा एकदा सौम्य शिक्षेसाठी विनंती केली. मग आमच्या वकिलांनीही आमची मागणी जोरात मांडली. कोर्टाचे कामकाज आता बऱ्याच प्रमाणात उरकलेले असल्याने आज शिक्षा सुनावावी असे आमच्या वकिलांचे म्हणणे होते. न्यायाधीशांनी पुन्हा एकदा स्वत: काढलेल्या टिपणांचे कागद वाचून पाहिले आणि आता शिक्षा मिळण्याची शक्यता आहे हे आमच्या लक्षात आले.

“ही घटना अगदी दुर्मिळातील दुर्मिळ नसली तरी एका मुलीचे आयुष्य उद्धवस्त करणारी नक्कीच आहे. अशा प्रकरणांत आरोपीला कठोर शिक्षा झाली नाही तर समाजापर्यंत चुकीचा संदेश जाऊन न्याय संस्थेवरचा लोकांचा विश्वास उडू शकतो. या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार नसला तरी कागदोपत्री पुराव्यांवरून हा गुन्हा घडल्याचे सिद्ध होत आहे. आरोपीने सहेतू या मुलीवर अत्याचार केलेला आहे. परंतु त्याला परस्पर शिक्षा करण्याचा प्रयत्न तिच्याशी संबंधित लोकांनी केला. या सर्व प्रकरणातील अतिशय महत्वाची माहिती गुप्त ठेवली. पोलीसांनाही गुंगारा देण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी स्वत:च त्या सगळया प्रकारचा उलगडा केला. सर्व पुरावे, उलटतपासणी याचा विचार करून न्यायालय आरोपीला २० वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा सुनावत आहे. तसेच श्री. रेवण जाधव, श्री. रविचंद्र कांबळे आणि त्यांना साथ देणारे डॉ. जोशी यांनी आरोपीला वैयक्तिक पातळीवर शिक्षा दिली म्हणून यांनादेखील प्रत्येकी एक वर्ष साध्या कैदेची शिक्षा सुनावत आहे. खरेतर या तिघांनी स्वत:हून या प्रकरणात नामुष्की ओढवून घेतली आहे. लोकांनी कायदा हातात घेऊन स्वत: आरोपीला शिक्षा करू नये. पोलीस, न्यायालय या यंत्रणांवर त्यांनी विश्वास ठेऊन योग्य मार्गाने आणि पद्धतीने न्यायासाठी लढावे असे अपेक्षित आहे आणि म्हणून या तिघांना ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. दुसरा चुकला म्हणून आपण चुकीच्या मार्गाने त्याला शिक्षा करणे योग्य नाही. या खटल्याचा समाजावर विपरीत परिणाम होऊ नये व कायद्यापुढे सर्व समान आहेत हे पुन्हा अधोरेखित व्हावे म्हणून या न्यायालयाने योग्य तो निवडा केला आहे असे माझे वैयक्तिक मत आहे.” न्यायाधीशांनी खटला निकालात काढला आणि निव्वळ आठ महिन्यांत आरोपीला शिक्षा मिळाली.

माझ्या घरातली अनुजा, रवीच्या घरातली रेवा किंवा कुठल्याही घरात असणारी मुलगी सुरक्षित राहावी म्हणून आम्ही हा सगळा खटाटोप केला. आजही केलेल्या कुठल्याही गोष्टीबद्दल वाईट वाटत नाही.

# ई साहित्य प्रतिष्ठान

## एक दम : तिन कामं

अभिनंदन मित्रांनो.

तुम्ही हे छोट्टंसं पुस्तक वाचून संपवलंत. थोडा टाईम पास झाला. पण टाईम फ़ुकट तर नाही गेला ना? झालंय काय की आज समाजाचं मन मुर्दाड होत चाललंय. सहसंवेदना संपतच चाललीय. अगदी आपल्या शेजारी अन्याय होत असताना बघे बनणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. आपण फ़क्त आपल्यापुरतं बघावं असा विचार करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. हे पोटार्थी समाजाचं लक्षण आहे. वाचन किंवा तत्सम संस्कारांपासून दूर जाणाऱ्या समाजाचं हे लक्षण आहे. म्हणून वाचन संस्कृती रुजायला हवी. एका छोट्याशा पुस्तकातून किती धडे मिळतात. तेही मनोरंजनासह. अशी खूप सारी ई पुस्तकं घेऊन ई साहित्य प्रतिष्ठान गेली काही वर्षं फ़ुकट वाटत असते. अक्षरशः शेकडो पुस्तकं. एकाहून एक भारी. सुंदर. मस्त. झक्कास. लय भारी. वाचन संस्कृती रुजवण्याच्या असंख्य लोकांच्या प्रयत्नांत आम्ही सहभागी आहोत. तुम्हीही व्हा.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान